# समीर भुजबळ यांना ८ फेब्रुवारीपर्यंत कोठडी

विशेष प्रतिनिधी, मुंबई

**महाराष्ट्र सदन** गैरव्यवहारप्रकरणी अटक करण्यात आलेल्या छगन भुजबळ यांचे पुतणे आणि माजी खासदार समीर भुजबळ यांना ८ फेब्रुवारीपर्यंत सक्तवसुली महासंचालनालयाची (ईडी) कोठडी सुनावण्यात आली आहे. सोमवारी रात्री सक्तवसुली महासंचालनालयाकडून ९ तासांच्या चौकशीत विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर देण्यात समीर भुजबळ अपयशी ठरल्याने त्यांना अटक करण्यात आली. यानंतर मंगळवारी त्यांना विशेष न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते.

दरम्यान त्याआधी समीर भुजबळ यांना वैद्यकीय तपासणीसाठी सेंट जॉर्ज रुग्णालयात नेण्यात आले होते. समीर भुजबळ यांनी किरीट सोमय्या हे भुजबळ कुटुंबीयांविरुद्ध कारवाई करण्यासाठी ईडीवर दबाव आणत असल्याचा आरोप केला. आतापर्यंतच्या तपासात ईडीला संपूर्ण सहकार्य केल्याचेही ते म्हणाले.

सुमारे दहा वर्षांपूर्वी गाजलेल्या तेलगी घोटाळ्यात समीर भुजबळ यांचे नाव पुढे आले होते व त्यांच्या डोक्यावर कारवाईची टांगती तलवार होती. तेव्हा थोडक्यात बचावलेल्या समीर यांनी बांधकाम घोटाळ्यात मात्र तुरुंगाची हवा खावी लागली आहे. अब्दुल करीम तेलगीच्या मुद्रांक घोटाळ्यात महाराष्ट्र व कर्नाटकातील बड्या राजकारण्यांची नावे पुढे आली होती. तेलगी घोटाळ्याच्या चौकशीसाठी नेमलेल्या विशेष चौकशी पथकाने माजी पोलीस आयुक्त रणजितसिंह शर्मा, सहआयुक्त श्रीधर वगळ यांच्यासह काही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना तुरुंगात टाकले होते. तेव्हाही छगन भुजबळ आणि समीर या काका-पुतण्याची नावे या घोटाळ्यात पुढे आली होती. समीरच्या एका निकटवर्तीयाला अटक झाली होती. समीरच्या जवळच्या एका बड्या इंधनमाफियाविरोधात 'मोक्का'न्वये कारवाई झाली होती. तेलगीकांडात समीर भुजबळ यांच्या विरोधात तेव्हा कारवाई केली जाणार अशी जोरदार चर्चा होती. त्या घोटाळ्यात काही बड्या धेंडांची नावे जशजशी पुढे येऊ लागली तसा चौकशीचा वेग मंदावत गेला. तेलगीच्या लाय डिटेक्टर चाचणीत काही नेत्यांची नावे आली आणि तपास खुंटत गेला. तेलगीला कर्नाटकातील न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा दिली आणि पुढे तेलगी प्रकरण थंड बस्त्यात गेले. राज ठाकरे, धनंजय यांनी काकांच्या विरोधात बंड करून वेगळी वाट धरली. भुजबळ यांनी मात्र पुतण्याच्या कलाने सारे घेतले.



समीर भुजबळ यांना मंगळवारी न्यायालयात हजर करण्यात आले. (प्रदीप दास)

### भुजबळांचा राजकीय वारस

भुजबळ यांचे पुत्र पंकज हे आमदार असले तरी पुतणे समीर हे त्यांचे राजकीय वारस मानले जातात. सर्व निर्णय भुजबळ हे समीर यांच्याशी सल्लामसलत करून घेतात, असे बोलले जाते. गेल्या लोकसभा निवडणुकीत नाशिक मतदारसंघात समीर यांच्याऐवजी स्वतः भुजबळ यांनी निवडणूक लढवावी, असा प्रस्ताव पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी मांडला असता तेव्हा नाशिकचे खासदार असलेल्या समीर यांना दुखविण्याची भुजबळ यांची इच्छा नव्हती. पण पक्षाच्या आदेशामुळे भुजबळ लढले होते. २००९च्या लोकसभा निवडणुकीत समीर हे नाशिक मतदारसंघातून विजयी झाले होते. समीर यांच्या विजयाचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून जुना राग बाजूला ठेवून भुजबळ हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या भेटीला गेले होते. मनसेला रोखण्याकरिता शिवसेनेने समीर यांना मदत केल्याची चर्चा होती.

## राजकीय हेतूने कारवाई झाल्याचा पवारांचा आरोप

### भुजबळांचे समर्थन की अन्य काही उद्देश?

विशेष प्रतिनिधी, मुंबई



शरद पवार

**राष्ट्रवादीच्या राजकारणात** छगन भुजबळ हे नेहमीच लक्ष्य झाले आहेत. याच भुजबळांच्या विरोधात कारवाईचा फास आवळला जाताच पक्षाध्यक्ष शरद पवार हे रिंगणात उतरले आणि राजकीय हेतूने कारवाई केला जात असल्याचा हल्ला त्यांनी भाजपवर चढविला. भुजबळांवरील 'प्रेमा'पेक्षा राष्ट्रवादीच्या इतर नेत्यांच्या विरोधात कारवाई होऊ नये म्हणून दबाव वाढविण्याकरिताच पवारांनी हा संदेश दिल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जाते.

समीर भुजबळ यांना अटक झाल्याने छगन भुजबळ हे पुढील लक्ष्य असल्याची चर्चा सुरू झाली आहे. विविध नेत्यांवरील आरोपांमुळे राष्ट्रवादीची प्रतिमा आधीच खराब झाली आहे. नेतेमंडळींना अटक झाल्यास त्याचा पक्षाला फटका बसू शकतो हे ओळखूनच स्वतः पवार रिंगणात उतरले. भुजबळांच्या विरोधात राजकीय सूडबुद्धीने कारवाई केली जात असल्याचा आरोप पवार यांनी पत्रकार परिषदेत केला. एकाच प्रकरणी तीनदा धाडी पडण्याचा प्रकार पहिल्यांदाच बघायला मिळाला. हे सारे राजकीय हेतूने प्रेरित वाटते, असेही पवार यांनी सांगितले. राज्यात आतापर्यंत सूडभावनेने कारवाई केली गेली नव्हती. अगदी १९९५ मध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सत्तेत आलेल्या युती सरकारने कधी अशी कारवाई केली नव्हती. या सरकारबद्दल काही समजत नाही, असे सांगत पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना लक्ष्य केले. भुजबळ यांच्यावर जे आरोप झाले ते निर्णय त्यांनी वैयक्तिक नव्हे, तर मंत्रिमंडळाच्या उपसमितीने घेतले होते याकडे पवार यांनी लक्ष वेधले. चौकशीला सामोरे जावे, असा सल्लाच पवार यांनी भुजबळ यांना दिला. दरम्यान, शनिशिंगणापूरप्रकरणी स्थानिक नेत्यांशी चर्चा करणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

### पवारांचा रोख कोणावर ?

भुजबळांचे पवार यांनी समर्थन केले असले तरी अजित पवार किंवा तटकरे यांच्या विरोधात त्या पद्धतीने कारवाई होऊ नये, असा राष्ट्रवादीचा प्रयत्न आहे. याच उद्देशाने पवार यांनी सत्ताधारी भाजपवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. समीर भुजबळ यांच्यावर कारवाई झाली असतानाच जलसंपदा खात्यातील घोटाळ्याची चौकशी अंतिम टप्प्यात आहे, असे सांगत गिरीश महाजन यांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांवर कुरघोडी केली.

### नाशिकमध्ये रास्ता रोको

**नाशिकः** समीर भुजबळ यांना अटक केल्याचे पडसाद मंगळवारी नाशिकमध्ये उमटले. राज्य सरकार सुडबुध्दीने कारवाई करत असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस आणि अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे रस्त्यावर उतरत ठिकठिकाणी निदर्शने व रास्ता रोको केला. शहरात काही बसगाड्यांवर दगडफेक झाली. अचानक झालेल्या आंदोलनामुळे पोलीस यंत्रणेची धावपळ उडाली.

## भुजबळच नेहमी अडचणीत कसे येतात?

विशेष प्रतिनिधी, मुंबई

**सुशीलकुमार शिंदे,** अशोक चव्हाण, नारायण राणे, छगन भुजबळ हे पहिल्या फळीतील नेते गेल्या काही वर्षांमध्ये विविध कारणांनी चर्चेत राहिले वा त्यांच्यावर आरोप झाले. यापैकी छगन भुजबळ मात्र नेहमीच अडचणीत आले आहेत. भुजबळच का अडचणीत येतात, असा प्रश्न नेहमी उपस्थित केला जातो.

अशोक चव्हाण यांना 'आदर्श' घोटाळ्यात राजीनामा द्यावा लागला. राणे यांच्यावर विविध आरोप झाले. शिंदे यांच्यावर 'आदर्श'मध्ये आरोप झाले. गेल्या दहा वर्षांमध्ये छगन भुजबळ हे दुसऱ्यांदा चांगलेच अडचणीत आले आहेत. तेलगी घोटाळ्याशी भुजबळ यांचे नाव जोडले गेले होते. विशेष चौकशी पथकाने भुजबळ यांना घाम फोडला होता. तेलगी घोटाळ्यात काही बडी नावे पुढे येऊ लागताच त्याचा तपास थंड बस्त्यात गेला. त्यातून भुजबळ सुदैवाने बचावले, पण महाराष्ट्र सदन आणि सार्वजनिक बांधकाम खात्यातील शुक्लकाष्ठ त्यांच्या मागे लागले.

भुजबळ यांच्या निकटचे त्यांच्यापासून दुरावले. त्यांनी सारी माहिती इतरांना पुरविली. यामुळेच भुजबळांची सारी थक्क करणारी संपत्ती उघड झाली. साऱ्याच नेत्यांनी मोठ्या प्रमाणावर मालमत्ता केली आहे वा गुंतवणूक केली आहे, पण कोणाचीच इत्यंभूत माहिती उघड झाली नाही.

## सुडाचे राजकारण नाही -खडसे

विशेष प्रतिनिधी, मुंबई

**माजी उपमुख्यमंत्री** छगन भुजबळ यांच्याविरोधात सुरू असलेली कारवाई राजकीय आकसाने केली जात असल्याच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या आरोपांचे महसूलमंत्री एकनाथ खडसे यांनी खंडन केले असून राज्य सरकार सुडाचे राजकारण करीत नसल्याचे स्पष्ट केले. कारवाईबाबत त्यांचे आक्षेप असतील तर ते न्यायालयात जाऊ शकतात, असे एकनाथ खडसे यांनी सांगितले.

राज्य सरकारच्या आर्थिक गुन्हे विभाग किंवा केंद्र सरकारच्या यंत्रणांकडे पुरावे असल्याने ही कारवाई होत आहे. त्याच्याशी राज्य सरकारचा काहीही संबंध नाही. कारवाईस कोणाचा आक्षेप असेल किंवा ती चुकीची आहे असे वाटत असेल तर संबंधित मंडळी न्यायालयात जाऊ शकतात, असे एकनाथ खडसे यांनी स्पष्ट केले.

टीजेएसबी बँक
विश्वास जिंदगी भर का
प्रस्तुत
लोकसत्ता
बदलता महाराष्ट्र
सहप्रायोजक
REGENCY GROUP
mep

तंत्रज्ञानाचा उदोउदो होतोय, पण बदलाच्या प्रक्रियेत कुठे आहे ते तंत्रज्ञान? शहरांना 'स्मार्ट' होण्याचे वेध लागले आहेत, पण खरेच त्यांचे स्वप्न पूर्ण होणार?...

'बदलता महाराष्ट्र'!

उद्यापासून, दोन दिवसांचे विचारमंथन. नामवंतांचा, विचारवंतांचा आणि यंत्रणांच्या धुरिणांचा सहभाग...

## सदोष मूल्यांकनामुळे निकाल रद्द करण्याची विद्यापीठावर नामुष्की

### 'टीवायबीए'च्या पाचव्या सत्राच्या निकालातील घोळ; विद्यार्थी अडचणीत

रेश्मा शिवडेकर, मुंबई

**चुकीचे 'क्रेडिट'** दिले गेल्याने 'तृतीय वर्ष कला शाखे'च्या (टीवायबीए) एप्रिल, २०१५मध्ये झालेल्या पाचव्या सत्राच्या परीक्षेचा निकाल रद्द करून तो नव्याने जाहीर करण्याची ऐतिहासिक नामुष्की मुंबई विद्यापीठावर ओढवली आहे. या सदोष मूल्यांकनाचा परिणाम टीवायबीए विद्यार्थ्यांच्या केवळ पाचव्या सत्राच्याच नव्हे, तर अंतिम निकालावरही होणार असल्याने त्यामुळे काहींचे पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेशही अडचणीत येण्याची शक्यता आहे.

पेपरफुटी, लांबणारे निकाल, त्यातले घोळ यामुळे विद्यापीठाचा परीक्षा विभाग कायमच चर्चेत असतो. पण या घोळाने या सर्वांवर कडी केली आहे. महत्त्वाचे म्हणजे तब्बल पाच महिन्यांनी हा घोळ विद्यार्थ्यांनी निदर्शनास आणून देईपर्यंत परीक्षा विभागाच्या लक्षातही आली नव्हता. 'लोकसत्ता'ने ३० जानेवारीला या संबंधात 'विद्यापीठाच्या निकालाचे 'क्रेडिट' पुन्हा चुकले' या मथळ्याखाली वृत्त देईपर्यंत विद्यापीठातील वरिष्ठांनाही या घोळाची माहिती नव्हती. या वृत्तानंतर मात्र विद्यापीठाने तातडीने परीक्षा मंडळाची बैठक घेऊन या निकालात सुधारणा करून संपूर्ण निकालच नव्याने जाहीर करण्याचे ठरविले आहे. तसेच या घोळाला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णयही घेतला आहे. या संदर्भात बुधवारी पुन्हा एकदा मंडळाची बैठक होणार असल्याचे विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी लीलाधर बनसोड यांनी सांगितले.ही परीक्षा 'टीवायबीए'च्या पाचव्या सत्राच्या पुनर्परीक्षार्थींकरिता घेण्यात आली होती. त्याला तब्बल ४६०९ विद्यार्थी बसले होते. परंतु यापैकी 'पेपर क्रमांक ६'ची परीक्षा दिलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा निकाल बदलणार आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांना मोठा फटका बसणार आहे.



विद्यापीठाच्या निकालाचे 'क्रेडिट' पुन्हा चुकले!

३० जानेवारीच्या अंकातील वृत्त

### घोळ नेमका काय?

'श्रेणीआधारित मूल्यांकन पद्धती'नुसार संगणकावर मूल्यांकन करून निकाल तयार करताना चुकीचे 'क्रेडिट' दिले गेल्याने निकालातच घोळ झाला. यात पदवीच्या तीनही वर्षातील सर्व पेपरमधील लेखी व अंतर्गत गुणांचा आढावा घेऊन निकाल तयार केला जातो. त्याला सीजीपीए म्हणतात. त्यासाठी 'क्रेडिट'ला पेपरच्या ग्रेडशी म्हणजे श्रेणीशी गुणायचे. ग्रेड म्हणजे त्या विषयाच्या लेखी परीक्षेतील गुण. (उदाहरणार्थ, ६० ते ७५ दरम्यान गुण असतील तर ग्रेड झाली सहा) क्रेडिट आणि ग्रेडच्या गुणाकारातून विद्यार्थ्याचा 'ग्रेड पॉइंट' बनतो. सर्व पेपरच्या ग्रेड पॉइंटची बेरीज करून त्याला सर्व पेपरच्या क्रेडिटच्या येणाऱ्या बेरजेने भागायचे आणि त्यानंतर येणारी संख्या म्हणजे एसजीपीए (सेमिस्टर ग्रेड पॉइंट ॲव्हरेज). अशी सहाही सत्रांची एसजीपीएची बेरीज करायची आणि येणाऱ्या संख्येला एकूण सत्रांनी (सहा किंवा आठ) भागायचे. त्यानंतर जी काही संख्या येईल त्याची सरासरी काढली की तो विद्यार्थ्यांचा सीजीपीए (अंतिम गुण) बनतो. या निकालात 'पेपर क्रमांक ६' करिता सरसकट सर्व विद्यार्थ्यांना एकच क्रेडिट दिले गेले.

## मुंब्रा-ठाणेदरम्यान रेल्वे अपघातात तीन बळी; दोन जखमी

प्रतिनिधी, ठाणे

**मुंब्रा-ठाणेदरम्यान** मंगळवारी झालेल्या पाच वेगवेगळ्या रेल्वे अपघातांत तीन जण ठार तर दोन जण जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. रामजोरे रामसोच यादव (६५) असे एका मृताचे नाव असून अन्य दोन मृतांची ओळख पटलेली नाही. तर अन्वर शेख (३६) आणि भाविज शेख (२५) हे दोन तरुण लोकलमधून पडून जखमी झाले आहेत. त्यांच्यावर ठाण्यातील आणि मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

उपनगरीय रेल्वेतील वाढत्या गर्दीमुळे वारंवार अपघात घडत असून त्याचबरोबर रेल्वे रूळ ओलांडण्यामुळेही अनेक नागरिकांचे प्राण जात आहेत. मंगळवारी दिवसभरामध्ये झालेल्या अपघातामध्ये रामजोरे यादव हे कळव्याजवळ दुपारी १२च्या सुमारास रेल्वे रूळ ओलांडताना मृत्युमुखी पडले. रामजोरे हे व्यवसायाने सुतार असून त्यांचे मूळ गाव उत्तर प्रदेशातील आहे. सध्या ते कळव्यातील गोपाळनगर येथे राहात होते. तर मुंब्रा-कळव्यादरम्यान दुपारी ११च्या दरम्यान एक २५ वर्षीय तरुण लोकलमधून पडून मृत्युमुखी पडला. तर त्याच ठिकाणी एक ३५ वर्षीय महिलाही रेल्वे अपघातात मृत्युमुखी पडल्याचे स्पष्ट झाले आहे. तर अन्वर शेख हा मुंब्रा बोगद्याजवळ रेल्वेतून पडून जखमी झाला असून त्याच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाली आहे.

### पत्नीची हत्या करणाऱ्यास जन्मठेप

**ठाणे :** कळवा येथील मफतलाल परिसरात तीन वर्षांपूर्वी घरगुती भांडणातून पत्नीची हत्या करणाऱ्या अजय आत्माराम जाधव याला ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाने सोमवारी जन्मठेपेची शिक्षा सुनावली.
कळवा येथील मफतलाल परिसरात यास्मीन ऊर्फ गुडिया (१९) ही आई-वडिलांसोबत राहत होती. या परिसरात अजय हा कामानिमित्त येत होता.अजय आणि गुडिया यांचे प्रेम जुळले आणि त्यांनी लग्न केले.१६ डिसेंबर २०१२ रोजी अजयने गुडियाची हत्या केली.

**दक्षिण पूर्व मध्य रेल्वे**

**विविध अभियांत्रिकी कामांसाठी निविदा सूचना**

भारताच्या माननीय राष्ट्रपतींच्या वतीने वरिष्ठ विभागीय अभियंता/लाईन/दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, रायपूर यांचे द्वारे खाली नमूद कामे पार पाडण्यासाठी विहित नमुन्यातील मोहरबंद निविदा आमंत्रित आहेत.
**निविदा क्र.E/R/T/141/2015-16, दिनांक:-२८.०१.२०१६**
**कामाचे नाव:**-एसएसई/पी.वे/भिलाई अंतर्गत सी/केबिन ते दुर्गपर्यंत विविध यार्डांमधील रेल्वेच्या जमिनीच्या बाहेरून रेल्वेच्या विनिर्देशांनुसार पॉईंट्स व खड्ड्यांसाठी ६७०० घ.मी. मशीन क्रश्ड ट्रॅक बॅलास्टचा पुरवठा, पोच व तो रचणे तसेच तो पॉईंट्स व क्रॉसिंग्जवर पसरविणे.
**निविदा मूल्य:**- रु. ४९,६४,७००/-, **बयाणा रक्कम:**- रु. ९९,३००/- **निविदा प्रपत्र शुल्क:**- रु.३,०००/-, **पूर्णता अवधी:**- ०६ (सहा) महिने.
**निविदा प्रपत्रे दि. २२.०२.२०१६ (११.०० वा.) ते दि. ०८.०३.२०१६ (१२.०० वा.) पर्यंत निर्गमित करण्यात येतील. निविदा प्रपत्रे दि. ०४.०३.२०१६ (११.०० वा.) ते दि. १०.०३.२०१६ (१२.०० वा.) पर्यंत स्वीकारण्यात येतील व दि. १०.०३.२०१६ रोजी १५.०० वाजता उघडण्यात येतील.**
अधिक माहिती/निविदा प्रपत्र खरेदी, अर्हता निकष व वरील कामाच्या संपूर्ण तपशिलासाठी कृपया वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय), दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, रायपूर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा आमच्या वेबसाईटवर **www.secr.indianrailways.gov.in** येथे उपलब्ध असलेले निविदा प्रपत्र पाहावे/डाऊनलोड करावे.
वरिष्ठ विभागीय अभियंता (लाईन)
विभागीय रेल्वे व्यवस्थापक (अभि.)/ रायपूर यांचेकरिता
PR/R/Engg/1P/217
स्वच्छ भारत अभियान

**खादी आणि ग्रामोद्योग आयोग**
Ministry of MSME (Govt. of India)
सीबीकोरा इंस्टीट्यूट, शिंपोली गाव, बोरीवली (पश्चिम)
EDP TRAINING PROGRAME
**CCTV BUSINESS**
प्रशिक्षण ६ व ७ फेब्रुवारी २०१६
सेक्युरिटी सप्लायर, इलेक्ट्रीशियनआयपी कॅमेरा, एएमसी बिझनेस आणि ई-टेंडरची माहिती
**कमी भांडवलाचा व्यवसाय**
*१ लाख पर्यंत कमविण्याची संधी
8082300033 / 8898888179 / 9664120881
25 लाखपर्यंत कर्ज योजना *जेवण,चहा,नाश्ता दिला जाईल.

**भारत ब्रॉडबॅण्ड नेटवर्क लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
BBNL
निविदा क्र.: बीबीएनएल/एमएच/एमबीआय/जीएम (प्रोजेक्ट-III)/वाहन टेंडर/२०१५-१६/०१
**निविदा सूचना**
बीबीएनएल, मुंबई युनिट भाडेतत्वावर वाहने पुरविण्याकरिता खुल्या निविदा आमंत्रित करीत आहे. इच्छुक बोलीकर्ते **www.bbnl.nic.in** या वेबसाईट वरुन लॉगऑन करु शकतील किंवा महाव्यवस्थापक (प्रोजेक्ट-III) एमएच, बीबीएनएल येथे ०२२-२६६०२७५२/०९९६९२०१२८२ वर संपर्क करु शकतील.
महाव्यवस्थापक
(प्रोजेक्ट-III), बीबीएनएल, मुंबई

**एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड**
कॉर्पोरेट आयडेंटीफीकेशन नंबर (सीआयएन): L45200MH2002PLC136779
रजिस्टर्ड ऑफीसः ए - ४१२, बूमरँग, चांदिवली फार्म रोड, चांदिवली स्टुडिओ जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०७२
इ-मेलः investorrelations@mepinfra.com वेबसाईटः www.mepinfra.com
टेलिफोन : 91 22 6120 4800 फॅक्सः 91 22 6120 4804
याद्वारे नोटीस दिली जाते की सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अ‍ॅण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या नियम ४७ (१) नुसार कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवार दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ रोजी आयोजित करण्यात आली असून त्यात कंपनीच्या ३१ डिसेंबर, २०१५ रोजी संपलेल्या तिसऱ्या त्रैमासिकाकरिता आणि नऊ महिन्यांकरिता, एकल आणि एकत्रित अशा दोन्ही प्रकारच्या अलेखापरिक्षित वित्तीय अहवालाचा विचार करून, मान्यता देऊन नोंदवण्यात येणार आहे.
याशिवाय सेबी (प्रोहिबिशन ऑफ इनसाइडर ट्रेडींग) रेग्युलेशन्स २०१५ आणि कंपनीच्या 'कोड ऑफ कंडक्ट फॉर प्रिव्हेन्शन ऑफ इनसाइडर ट्रेडींग' नुसार कंपनीच्या सिक्युरिटीजमध्ये व्यापार करण्यासाठी ट्रेडींग विंडो २ फेब्रुवारी, २०१६ ते ११ फेब्रुवारी, २०१६ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहील.
सदर नोटीस कंपनीच्या www.mepinfra.com या वेबसाइटवर आणि स्टॉक एक्स्चेंजची वेबसाइट www.bseindia.com आणि www.nseindia.com वरही उपलब्ध असेल.
संचालकमंडळ करिता
एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड
Sd/-
श्रीधर फडके
कंपनी सेक्रेटरी
ठिकाण: मुंबई
दिनांक: ०२/०२/२०१६

**NOTICE**

NOTICE is hereby given that certificates for the undermentioned shares of ACC Limited have been misplaced and undersigned have applied to the Company to issue duplicate certificate(s) for the said shares.

| Folio No. | Name of the shareholder | No. of equity shares | Distinctive Numbers |
|---|---|---|---|
| R37255 | MRS. RASHMI DARRYL BRAGANZA<br>JT. : ANIKET ANDRE BRAGANZA<br>JT. : VIRAAJ GAURAV BRAGANZA | 732 Shares of Rs. 10/- f.v. | 64951228/ 64951389<br>38449301/ 38449870 |

Any person(s) in possession of the said share certificates of having any claim(s) to the said shares should notify to and lodge such claim(s) with the share Department of the Company at Cement House, 121 Maharshi Karve Road, Mumbai-400 020 within 21 days from the date of Publication of this Notice after which period no claims will be entertained and the Company will proceed to issue duplicate share certificates.

**Place :** Mumbai
**Date :** 03.02.2016

Sd/- MRS. RASHMI DARRYL BRAGANZA
ANIKET ANDRE BRAGANZA
VIRAAJ GAURAV BRAGANZA



**सार्वजनिक आरोग्य विभाग**
महाराष्ट्र शासन

**डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार योजना २०१५-१६**

भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आरोग्य विभागाने २०१५-१६ या वर्षासाठी पुरस्कार योजना घोषित केली आहे.

**पुरस्काराचे स्वरूप :**

**जिल्हास्तरीय पुरस्कार**

| क्र. | आरोग्य संस्था | प्रथम पुरस्कार | द्वितीय पुरस्कार | तृतीय पुरस्कार |
|---|---|---|---|---|
| १. | आरोग्य उपकेंद्र | रु. १५ हजार | रु. १० हजार | रु. ५ हजार |
| २. | प्राथमिक आरोग्य केंद्र | रु. २५ हजार | रु. १५ हजार | रु. १० हजार |
| ३. | ग्रामीण रुग्णालय अथवा उपजिल्हा रुग्णालय | रु. ५० हजार | -- | -- |

**राज्यस्तरीय पुरस्कार (केवळ प्रथम पुरस्कार)**

| क्र. | आरोग्य संस्था | प्रथम पुरस्कार |
|---|---|---|
| १. | आरोग्य उपकेंद्र | रु. ३० हजार |
| २. | आदिवासी क्षेत्रातील उपकेंद्रे | रु. ३० हजार |
| ३. | प्राथमिक आरोग्य केंद्र | रु. ५० हजार |
| ४. | आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र | रु. ५० हजार |
| ५. | ग्रामीण रुग्णालय | रु. ७५ हजार |
| ६. | उपजिल्हा रुग्णालय/जिल्हा रुग्णालय/स्त्री रुग्णालय | रु. १ लाख |
| ७. | खाजगी संस्था | रु. १ लाख |

**वैयक्तिक पुरस्कार**

| क्र. | आरोग्य संस्था | प्रथम पुरस्कार |
|---|---|---|
| १. | खाजगी स्त्री डॉक्टर (आदिवासी क्षेत्र) | रु. २५ हजार |
| २. | खाजगी स्त्री डॉक्टर (बिगर आदिवासी क्षेत्र) | रु. २५ हजार |
| ३. | खाजगी डॉक्टर (आदिवासी क्षेत्र) | रु. २५ हजार |
| ४. | खाजगी डॉक्टर (बिगर आदिवासी क्षेत्र) | रु. २५ हजार |
| ५. | शासकीय स्त्री डॉक्टर (आदिवासी क्षेत्र) | रु. २५ हजार |
| ६. | शासकीय स्त्री डॉक्टर (बिगर आदिवासी क्षेत्र) | रु. २५ हजार |
| ७. | शासकीय डॉक्टर (आदिवासी क्षेत्र) | रु. २५ हजार |
| ८. | शासकीय डॉक्टर (बिगर आदिवासी क्षेत्र) | रु. २५ हजार |

- शासकीय संस्थांनी आपल्या प्रवेशिका जिल्हास्तरीय समितीमार्फत तर खाजगी संस्था व खाजगी डॉक्टर्सनी आपल्या प्रवेशिका संबंधित विभागाच्या आरोग्य सेवा, उपसंचालक, प्रभारी मंडळामार्फत सादर कराव्यात.
- जिल्हास्तरीय प्रवेशिका प्राप्त करुन घेण्याची **अंतीम तारीख : ०६ फेब्रुवारी २०१६** (शासकीय संस्था व डॉक्टर)
- विभागीय स्तरावर प्रवेशिका प्राप्त करुन घेण्याची **अंतीम तारीख : ०१ मार्च २०१६** (खाजगी संस्था व डॉक्टर)
- इच्छुक खाजगी संस्था व डॉक्टर्सनी आपल्या मंडळाच्या आरोग्य उपसंचालकांशी त्वरित संपर्क साधावा.
- प्रवेशिकांसाठी कोणताही विहित नमुना नाही. संस्थेच्या अथवा व्यक्तिंच्या कामाबद्दल निकषाप्रमाणे अहवाल आणि छायाचित्रे सादर करावीत.

**या योजनेच्या अधिक माहितीसाठी संपर्क साधा-**
**उपसंचालक (आरोग्य सेवा)**
**राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग**
'परिवर्तन' बिल्डींग, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर, येरवडा, पुणे ४११ ००६.
**दूरध्वनी ०२०- २६६१०१७९ / २६६१०१८०**